स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवव्यविद्याशाखांतर्गत इतिहास विषयात पीएच. डी. साठी सादर करावयाच्या संशोधनाचा

आराखडा

''छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनिती : एक ऐतिहासिक अभ्यास''

संशोधक विद्यार्थी

राम उद्धवराव सुर्यवंशी

एम. ए. इतिहास, सेट, नेट

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राम साहेबराव फुन्ने

प्राचार्य

स्व. नितिन महाविद्यालय,

पाथरी, जि. परभणी

२०२१

प्रस्तावना :

भारताच्या इतिहासाचे सतरावे शतक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने ओळखले जाते. स्वराज्याची स्थापना करून त्यांनी मरगळलेल्या मराठी मनाला उभारी देण्याचे काम केले होते. मोगल, आदिलशाही, निजामशाही यांच्या सतत होणाऱ्या आक्रमणामुळे मराठी भूमिच नाही तर मराठी संस्कृती देखील धोक्यात आली होती. मराठी माणसाच्या जीवनास आणि संस्कृती यास उभारी देण्यासाठी एकही सत्ता सतराव्या शतकात अस्तित्वात नव्हती. सततच्या आक्रमणामुळे शेती उजाड होत चालली होती. मराठी लोकांचे जीवन, स्त्रियांची अब्रू, माणसाच्या जगण्याची सुरक्षितता आणि आर्थिक स्त्रोत हे नष्टप्राय होऊ लागले होते. मोगल, आदिलशाही, निजामशाही या सत्ताच्या राक्षसी आक्रमणास पायबंद घालणारी एकही शक्ती सतराव्या शतकात महाराष्ट्रात अस्तित्वात नव्हती. मराठी माणसाचे होणारे सर्वांगीण शोषण थांबवण्यासाठी त्याकाळी शहाजी राजांनी प्रयत्न केला, परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना यश प्राप्त झाले नाही. या सर्व पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा झालेला उदय हा लक्षणीय ठरतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने तोरणा किल्ला जिंकला आणि स्वराज्य निर्मितीचा प्रारंभ केला. उत्तरोत्तर शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याचा विस्तार केला आणि मराठी माणसाच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून दिला. त्यांनी केलेल्या स्वराज्य स्थापनेमुळे मराठी मनाला आलेली मरगळ दूर झाली. परिणामी मराठी माणूसही राज्यकर्ता होऊ शकतो हा विश्वास मराठी माणसाच्या मनात निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महारांनी राज्य करताना अनेक धोरणे राबवली. आपल्या राज्यात त्यांनी नेटकेपणाने राज्य चालावे यासाठी अनेक पदे निर्माण करून त्या पदाच्या माध्यमातून राज्यव्यवस्था सुदृढ करण्याचं काम केलं. त्यांच्या राज्याभिषेकानंतर त्यांनी अष्टप्रधान मंडळ निर्माण केले व कामाची विभागणी करून राज्यकारभार योग्य प्रकारे चालेल याची काळजी घेतली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळच निर्माण केले असे नव्हे, तर या अष्टप्रधान मंडळास त्यांनी वेळोवेळी पत्र लिहून त्या पत्रांच्या माध्यमातून आज्ञा आणि सुचनाही केल्याचे

आढळते. त्यांनी लिहिलेली पत्रे ही त्यांच्या राजनितीचे दर्शन घडवताना दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांची राजनिती त्यांच्या पत्रांच्या माध्यमातून अभ्यासता येते. राजनिती आणि राजकारण या दोन संज्ञामध्ये फरक आहे. राजनिती म्हणजे सत्ता प्राप्त झाल्यानंतर ती व्यवस्थित अमलात आणण्यासाठी जी विविध धोरणे आखावी लागतात त्यास राजनिती म्हणतात. राजकारण म्हणजे सत्ता प्राप्त करण्यासाठी अमलात आणावयाची धोरणे होय.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जी पत्रे लिहिली, त्या पत्रातून आलेली आर्थिक निती, लष्करी निती, प्रशासकीय निती, धार्मिक निती, राजकीय निती या बाबींचा प्रस्तुत संशोधनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी केला आहे. यामध्ये इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने, प्र. न. जोशी यांच्या शिवरायांची पत्रे, अनुराधा कुलकर्णी यांच्या शिवछत्रपतींचे पत्रे, डॉ. न. भा. काकडे यांच्या शिवरायांची अस्सल पत्रे, भा. वा. भट यांच्या शिवाजीची राजनिती, प्र. न. देशपांडे यांचे छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, बाळशास्त्री हरदास यांच्या पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज इ. ग्रंथाचा मागोवा घेण्यात येणार आहे. याशिवाय गो. स. सरदेसाई लिखित 'मराठी रियासत' या ग्रंथाचा देखील या संशोधनामध्ये आढावा घेण्यात येणार आहे.

संशोधन कार्य आणि विद्यमान संशोधनातील फरक :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाबद्दल आणि त्यांच्या कार्याबद्दल संशोधन झाले आहे. या संबंधात अनेकांची रचना आहे. यात डॉ. बाळकृष्ण यांचे "Shivaji the great", कृ. अ. केळूसकर यांचे छत्रपती शिवाजी महाराज, जदूनाथ सरकार यांचे Shivaji & his times, बा. मो. पुरंदरे यांचे राजा शिवछत्रपती इ. ग्रंथाचा समावेश होतो. तसेच महाराजांच्या पत्रांवरही अनेक ग्रंथ आहेत. यात प्र. न. देशपांडे यांचे छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, अनुराधा कुलकर्णी यांचे शिवछत्रपतींची पत्रे, डॉ. न. भा. काकडे यांचे शिवरायांची अस्सल पत्रे इ. ग्रंथ आहेत.

प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा नाममात्र अभ्यास होणार असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनितीचा प्रामुख्याने संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

समस्या सुत्रण :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांचा अभ्यास झाला आहे हे निश्चित. परंतु तत्कालीन परिस्थितीमध्ये शिवाजी महाराजांच्या नावाने अनेक बनावट पत्रे लिहिले गेल्याचे दिसून येते. त्या पत्रांमुळे शिवाजी महाराजांची धोरणे किंवा राजनिती समजून घेताना संभ्रम निर्माण होऊ शकतो. म्हणून महाराजांच्या अस्सल पत्रांची छाननी करून त्यातील राजनितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने "छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनिती" हा विषय निवडला आहे.

संशोधन कालावधी, व्याप्ती आणि मर्यादा :

छत्रपती शिवाजी महाराजांनी लिहिलेल्या अस्सल पत्रांवर या संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे. या संशोधनाचा कालावधी हा १६४६ ते १६८० या दरम्यान शिवाजी महाराजांनी लिहिलेल्या पत्रांवर आधारित आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभार करत असताना त्यांनी लिहिलेल्या पत्रांमधून आलेली आर्थिक निती, लष्करी निती, प्रशासकीय निती, धार्मिक निती तसेच राजकीय नितीचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. ही या संशोधनाची मर्यादा म्हणावी लागेल.

विषय निवडीचा उद्देश :

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने, मुत्सद्देगिरीने, बुद्धीचातुर्याने स्वराज्याची स्थापना केली ही एक अलौकिक घटना होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी हाती तलवार घेऊन रणकौशल्य दाखविण्याबरोबरच, लेखनी हाती घेऊन कौशल्य आणि चातुर्यही दाखवले. त्यांच्या कुशल राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व्यवहाराचा विचार करताना त्यांनी पत्रांमधून वापरलेल्या राजनितीचा विचार करावा लागतो. स्वराज्य निर्मितीचे कार्य करत असताना त्यांच्या

पत्रांतील आर्थिक, धार्मिक, प्रशासकीय, लष्करी तसेच राजकीय नितीचा चिकित्सक अभ्यास होणे आवश्यक वाटते. त्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनिती' हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

मध्ययुगीन काळातील राजकीय व्यवस्थेमध्ये कल्याणकारक राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखले जाते. तत्कालीन परिस्थितीत त्यांनी घेतलेले अनेक निर्णय कल्याणकारी होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतलेल्या निर्णयाचे पुरावे म्हणून त्यांनी लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख होतो. त्यांनी पत्रांद्वारे वापरलेली धार्मिक, आर्थिक, लष्करी, प्रशासकीय तसेच राजकीय राजनिती आजही आपल्या राज्यकर्त्यांना प्रोत्साहन देईल. म्हणून संबंधीत विषय महत्त्वाचा ठरतो.

उद्दिष्ट्ये :

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनितीचे महत्त्व अभ्यासणे.

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांद्वारे अर्थकारणाचा अभ्यास करणे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांद्वारे धार्मिक परिस्थितीचा उलगडा करणे.

४. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांद्वारे लष्करी सामर्थ्याचा अभ्यास करणे.

५. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांद्वारे प्रशासकीय पैलूंवर प्रकाश टाकणे.

६. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांद्वारे राजकीय व्यवस्था अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रव्यवहारातून आर्थिक निती पहावयास मिळते.

२. छत्रपती शिवाजी महाराजांनी लष्करी नितीविषयक पत्रव्यवहार केलेले आढळतात.

३. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासकीय नितीविषयक पत्रव्यवहार आढळतात.

४. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रातून धार्मिक निती प्रतित होते.

५. छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध राजसत्तांसोबत राजकीय पत्रव्यवहार केल्याचे उल्लेख आढळतात.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत अभ्यासाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून संशोधन पुर्णत्वास नेले जाणार आहे. यात आशय विश्लेषण पद्धतीचा वापर संशोधक करणार आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अस्सल पत्रांचा अभ्यास करण्यात येणार असून महाराजांच्या चरित्राचा नाममात्र अभ्यास करणार आहोत. संशोधन करताना साधनांचा वापर खालीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रथम दर्जाची साधने :

प्रथम दर्जाच्या साधनांमध्ये शिक्कमोर्तब असलेल्या सनदा व पत्रे.

दुय्यम दर्जाची साधने :

चरित्रे, बखरी, शकावल्या, वंशावळी, कैफियती, काव्यग्रंथ इ.चा समावेश होतो.

प्रकरणाची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करताना एकूण सात प्रकरणात विभागणी करण्यात आली आहे, ती खालीलप्रमाणे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन आराखडा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अथक प्रयत्नानंतर स्वराज्य उभे राहिले. स्वराज्य निर्माण करत असताना त्यांना वेगवेगळ्या अडचणीचा सामना करावा लागला. या सर्व अडचणीवर त्यांनी आपल्या बुद्धीचातुर्याने योग्य प्रकारे मात केली. त्यांच्या बुद्धीचातुर्याची झलक आपणास त्यांनी लिहिलेल्या पत्रांमध्ये दिसून येते. त्यांनी राज्यकारभार करत असताना पत्रांद्वारे वेगवेगळ्या सुचना आणि आज्ञा देऊन हाताबाहेर गेलेली परिस्थितीसुद्धा आटोक्यात आणल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणात आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनितीची पार्श्वभूमी तसेच पुर्वपरिस्थितीचा अभ्यास करणार आहोत. या प्रकरणात संपूर्ण संशोधन कार्याचा आढावा घेणारा संक्षिप्त आराखडाही समाविष्ट करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : छत्रपती शिवाजी महाराज : जीवन चरित्र

जगाच्या इतिहासात मराठ्यांचा इतिहास अद्वितीय असा आहे. मराठ्यांचे स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापन करून छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन भारताच्या इतिहासात नवे पर्व सुरू केले. स्वराज्याचे नंतरच्या काळात साम्राज्यात रूपांतर झाले. भारतातील सर्वात शक्तीशाली सत्ता म्हणून मराठ्यांचे साम्राज्य ओळखले जात होते. शिवरायांचा महत्त्वाचा गुण म्हणजे कमालीचा साधेपणा हा होय. सैन्याबरोबर राहून त्यांनी सर्व कसोटीच्या व संकटांच्या प्रसंगाना आनंदाने तोंड दिले. शिवरायांनी समानतेचे तत्व जोपासले. सैन्यामध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांना समाविष्ठ करून घेतले. शेतकरी, सामान्य माणूस, कारकून, आदिवासी या सर्वांना महत्त्वाचे स्थान दिले. सर्व विरोधी सत्तांना नमवून महाराजांनी स्वराज्य निर्माण केले.

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंत घडलेल्या घटनाक्रमांचा आढावा घेणार आहोत. यात त्यांचा जन्म, शिक्षण, त्यांचे लग्न, त्यांचा राजकारणातील प्रवेश, त्यांनी केलेली युद्धे, तह, जीवन संघर्ष, राज्याभिषेक, राज्याभिषेकाबद्दलचा वाद आणि त्यांचा मृत्यू आदिंचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजकीय निती

शिवरायांनी आपली राज्यस्थापना आणि राज्यविस्तार आदिलशाही, मोगल, युरोपीय, सिद्दी यांना आव्हान देऊन निर्माण केली. त्यांच्यासोबत तह, युद्ध आणि उपेक्षा असे तिहेरी धोरण त्यांनी अवलंबले. त्यांनी जी युद्धनिती स्वीकारली त्यामागेही राजनिती होती. महाराजांनी स्वराज्य निर्माण करत असताना मोठ्या प्रमाणात घोडदळ, पायदळ यासोबतच युरोपियनांच्या धर्तीवर आरमारही उभारले होते. याबरोबरच कुशल असे गुप्तहेर खातेही महाराजांनी स्थापन केले होत. ज्याचा प्रमुख बहिर्जी नाईक होता. महाराजांना स्वराज्य स्थापन करण्यासाठी प्रभावी लष्कराचे महत्त्व कळले होते. म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील प्रबळ सत्तासंघर्ष लक्षात घेता लष्कराच्या मजबूतीकरणावर भर दिला होता. महाराजांनी लष्करी मोहिमांमध्ये कोणत्याही प्रकारच्या बडेजावपणाला वाव दिला नाही. त्यांनी लष्कराला नेहमी कडक शिस्तीत ठेवण्याचा प्रयत्न केला. सैन्य मोहिमेवर असताना महिलांना

सोबत घेऊन जाण्यावर बंदी होती. महाराज स्वत:ही या गोष्टीचे पालन करत असत. लष्कराबरोबरच किल्ल्यांनाही मोठ्या प्रमाणात महत्त्व महाराजांनी दिले. रायगड, प्रतापगड यासारखे डोंगरी किल्ले आणि सिंधुदुर्ग, विजयदुर्ग यासारखे सागरी किल्लेही स्वराज्यात होते. किल्ला हा त्या त्या प्रदेशातील नियंत्रणाचे केंद्र असत म्हणून किल्ल्यांनाही महत्त्व आहे.

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनितीद्वारे लष्करावर पडलेला प्रभाव, किल्ले व आरमाराचे महत्त्व तसेच युद्धातील राजनितीबरोबरच तह आणि अन्य राजकीय घडामोडीमध्ये आपल्या पत्रांद्वारे राजकीय कलाकौशल्याचा कशाप्रकारे उपयोग केला याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील प्रशासकीय निती

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने सतरावे शतक हे अत्यंत गोंधळाचे शतक होते. मुघलशाही, आदिलशाही, कुतुबशाही या तीन शाह्या अस्तित्वात होत्या. या तिन्हीमध्ये मुघलशाही ही अधिक शक्तीशाली होती. त्यामुळे उर्वरित दोन शाह्यांना गिळंकृत करण्याचा तिचा सतत प्रयत्न असे. या सत्तासंघर्षात सामान्य माणूस हवालदील झालेला होता. त्यांची ससेहोलपट होत होती. कोणतीही शाही कोणत्या ना कोणत्या कारणाने सुरक्षितता देऊ शकत नव्हती. अशा नैराश्यपूर्ण पार्श्वभूमीवर शिवशाहीची स्थापना झाली आणि स्वराज्यातील मराठी माणसास अन्न, वित्त, आश्रय यांची सुरक्षितता मिळेल असे वाटल्याने स्वराज्यनिर्मितीत सहभाग घेतला होता. शिवरायांच्या स्वराज्यनिर्मितीचे, प्रस्थापनेचे अंतिम उद्दिष्ट हे लोकसुख व लोककल्याण असेच होते हे निर्विवाद आहे. हे उद्दिष्ट निश्चित झाल्यानंतर सर्वसामान्य जनतेचे समाधान होईल अशीच शासनप्रणाली निर्माण करून ती रूजविणेही त्यांना गरजेचे वाटले.

सशक्त प्रशासनासाठी योग्य अशी प्रशासकीय निती अमलात आणावी लागते. महाराजांनी ही गोष्ट हेरून योग्य अशा अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती. त्याचबरोबर अष्टप्रधान मंडळातील प्रत्येक सदस्याला आपापली जबाबदारी चोख पार पाडण्याची ताकिद देखील देण्यात

आली होती. महाराजांनी आपल्या पत्रात कशाप्रकारे न्यायव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि अष्टप्रधान मंडळाचे कामकाज पार पाडले याचा अभ्यास आपण प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील धार्मिक निती

मध्ययुगीन काळातील दुरदर्शी विचारांचा राजा म्हणून शिवाजी महाराजांची नोंद इतिहासाला ठेवावीच लागणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या स्वराज्याची निर्मिती केली होती ते राज्य कोणत्याही एका विशिष्ट धर्माला प्राधान्य देणारे किंवा आधारभूत मानणारे नव्हते. मध्ययुगीन काळात ज्या काही सत्ता भारतात अस्तित्वात होत्या त्या सर्व सत्तांचा आधार हा धर्म होता. असे असतानाही छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यास हिंदू धर्माचाच आधार दिला होता. असे प्रतिपादन करणे म्हणजे शिवाजी महाराजांची प्रतिमा संकुचित करण्यासारखे होईल.

सतराव्या शतकातील सत्ताधाज्यांची धर्मनिष्ठा ही अत्यंतिक वैयक्तिक स्वरूपाची होती. हिंदू राजे वा मुस्लिमधर्मीय राजे यांनी बहुतांश वेळा आपल्या वैयक्तिक धर्माचा प्रभाव राज्यकारभारात उमटू दिला नव्हता. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या राज्यातील सर्वच प्रजाजन केवळ आपल्याच धर्माचे नाहीत याची त्यांना जाण होती. या कालखंडातील राजे हे वैयक्तिक आयुष्यात पराकोटीचे धर्मश्रद्ध होते यात शंकाच नाही. शिवरायही धर्मश्रद्ध होते. म्हणून असे राजे राज्य करताना आपला धार्मिक दृष्टीकोन कसा ठरवित होते याचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. म्हणूनच शिवरायांचा धार्मिक नितीचा विचार करताना त्यांच्या पत्रांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील आर्थिक निती

कोश आणि सेना ही कोणत्याही राज्याची प्रधान बलकेंद्रे असतात. कौटिल्याने या दोहोमध्ये कोश अधिक महत्त्वाचा मानला. स्वराज्य स्थापनेसाठी महाराजांना प्रबळ शत्रुशी लढा देण्यासाठी सबळ सैन्याची, युद्धसामग्रीची गरज होती. त्यासाठी आर्थिक घडी मजबूत होणे नितांत गरजेचे होते. शिवरायांनी ज्याप्रमाणे सत्ता प्रस्थापित करण्यासाठी एक विशिष्ट दृष्टीकोन बाळगला होता. त्याचप्रमाणे जनतेचे, पर्यायाने राज्याचे उत्थापन व्हावे हाही हेतू बाळगला होता. मुघल, आदिलशाही

यांच्याशी सातत्याने होणाऱ्या चकमकी व लढाया या पैशाच्या अभावी बंद करण्याचा प्रसंग येऊ नये हा विचारही अर्थनिती निश्चित करताना बाळगणे त्यांना आवश्यक होते. अमाप पैसा वसूल करायचा, त्यासाठी लुटमार, शोषण करायचे ही पद्धत शिवारायांनी राज्य निर्माण करण्यापूर्वी अस्तित्वात होती, परंतु शिवरायांनी स्वराज्यनिर्मिती करून शोषणप्रधान पद्धत नष्ट केली आणि रयतेच्या हितास पोषक ठरेल अशी अर्थनिती जाणिवपूर्वक स्वीकारली.

प्रस्तुत प्रकरणात स्वराज्यातील कृषी निती, करप्रणाली यासारख्या आर्थिक बाबींवर महाराजांच्या पत्राद्वारे पडलेला प्रभाव व त्या हाताळण्यासाठी वापरलेले कौशल्य यांचा विचार करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : समारोप - निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात वरील सहा प्रकरणांचा समारोप व लिखाणाअंती हाती लागलेले निष्कर्ष नोंदवण्यात येतील.

संशोधन विषयाची फलनिष्पती :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांवर मोठ्या प्रमाणात लेखन झाले आहे. परंतु महाराजांच्या पत्रांतील राजनितीचा अभ्यास झालेला दिसत नाही.

प्रस्तुत संशोधनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रांतील राजनितीचा अभ्यास करण्यात येणार असून त्यातील आर्थिक, धार्मिक, लष्करी, प्रशासकीय तसेच राजकीय नितीचा विशेषत्वाने अभ्यास करणार आहोत. हिच संशोधन विषयाची फलनिष्पती म्हणावी लागेल.

संदर्भ ग्रंथसुची :

1. Dr. Bal Krishna : ‘shivaji the great’, The Aryan Book Depot, Kolhapur (1940)
2. Sarkar Jadunath : ‘shivaji & His times’, Orient Blackswan, Hyderabad (2010)

३. पुरंदरे ब. मो. : 'राजा शिवछत्रपती (भाग १ व २)', पुरंदरे प्रकाशन, पुणे (२०१२)

४. काकडे नभा अनिलः 'छत्रपती शिवरायांची अस्सल पत्रे', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद (२०११)

५. देशपांडे प्र. न. : 'छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे', राजवाडे संशोधन मंडळ, धुळे (२०१०)

६. भट भा. वा. : 'शिवाजीची राजनिती', राजवाडे संशोधन मंडळ, धुळे (२०१०)

७. कुलकर्णी अ. रा. : 'अशी होती शिवशाही', राजहंस प्रकाशन, औरंगाबाद (१९९९)

८. कुलकर्णी अनुराधा : 'शिवछत्रपतींची पत्रे (खंड-२)', परममित्र प्रकाशन, ठाणे (२०१८)

९. हरदास बाळशास्त्री : 'पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज', लाखे प्रकाशन, नागपूर (२०१८)

१०. राजवाडे वि. का. (सं.): 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड- ८)', कोल्हापूर (१९१३)

११. जोशी श. ना. (सं.) : 'शिवकालीन पत्रसार संग्रह', भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे (१९३६)

१२. सरदेसाई गो. स. : 'मराठी रियासत', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई (१९३५)

१३. वाकसकर वि. स. (सं.) : श्री शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर', व्हिनस प्रकाशन, पुणे (१९६२)

१४. जोशी श. ना. (सं.) : 'सभासद बखर', भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे (१९५९)

संशोधक

राम उद्धवराव सुर्यवंशी
एम. ए. इतिहास, सेट, नेट

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राम साहेबराव फुन्ने
स्व. नितिन महाविद्यालय,
पाथरी, जि. परभणी